


दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर

dainiklokaarambh@gmail.com

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शनिवार १६ नोव्हेंबर २०२४ | अंक ३४२ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# एकाला उठता बसता येईना, दुसरा बसला तर उठायचं नावचं घेईना आडसकरांचा विरोधकांवर शाब्दिक हल्ला.

## मला एक संधी द्या प्रशासन सरळ करतो- रमेश आडसकर

माजलगाव / प्रतिनिधी

दि. १५ माजलगावला दोन दादा आहेत. या दोन्ही दादांच्या दोन तऱ्हा आहेत. एका दादाला वयोमानामुळे उठता, बसता येइना. कार्यकर्त्यांना धरून त्यांना चालावे लागत आहे. तरीही त्यांना सत्तेचा मोह सुटेना. दुसरा दादा एकदा बसला तर उठायचं नावं घेत नाही अश्या उमेदवारांना तूम्ही आमदार म्हणून स्वीकाराल का? असा टोला आडसकरांनी आज लगावला. आज दि. १५ रोजी तालुक्यातील मोगरा, डाके पिंपरी, कोथाळा, खतगव्हाण, साळेगाव या गावात रमेश आडसकरांच्या प्रचार



दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या प्रचार दौऱ्याला जनतेचा उस्फुर्त प्रतिसाद मिळत असुन कॉर्नर बैठकांचे रूपांतर जाहीर सभेत होत आहे.या प्रसंगी रमेश आडसकरांनी विरोधकांवर तुफान टीकास्त्र सोडले. मतदारसंघांच्या लोकप्रतिनिधीला वयोमानामुळे फिरणे मुश्किल झाले आहे. एका जागी बसले तर उठवायला चार चार माणसे लागत आहेत. तरीही त्यांना सत्तेचा मोह सुटत नसल्याने त्यांची दयनीय अवस्था पाहवत नाही.त्यांचे राजकारण करण्याचे वय नसून टक्केवारी चांगली मिळाली असल्याने तीर्थाटन करावे. त्यांच्या शारीरिक अकार्यक्षमतेमुळे मतदारसंघांला योग्य न्याय मिळणार नाही त्यामुळे त्यांनी निवृत्ती स्वीकारावी असा सल्लाही त्यांनी या प्रसंगी दिल. दूसरे दादा तर कमालीचे तळीरामचं निघाले. सभेत आलेल्या शेकडो महिलांना मान खाली घालायला लावणारी शिवराळ अश्लील भाषा बोलतात, जाहीर सभेत मी दारु पितो हे स्वतः कबूल करतात. माणसाच्या जिभेवरचा तोल कधी ढळत असतो? याचा एकदा जनतेनी विचार करावा.बहुदा सभेतही ते सोमरस प्राशन करून आले असावेत. असा टोला आडसकरांनी लगावला.माझ नान खणखणीत आहे. जनतेसाठी रात्रीचा दिवस करेल. मला संधी मिळाल्यास तलाठी, ग्रामसेवक यांना गावातच थांबावे लागणार. डी. पी जळाल्यास चार दिवसात नवीन डी. पी. ऊपलब्ध करून देणार. रस्ते,जोडरस्ते उभा राहून करून घेणार. अनेक गावांना नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणार, प्रशासन जनतेसाठी असते हा हबाडा प्रशासन जनतेच्या दारात आणणार असल्याचेही आडसकरांनी सांगीतले या वेळी त्यांच्या सोबत मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अशोक डक, मनोहर डाके, बाळासाहेब जाधव, डॉ.अभिजित सोळंके, तन्मय होके पाटिल, यांच्यासह सरपंच,उपसरपंच व ग्रामस्थांची उपस्थिती होती.

## ओबीसी ने सांभाळली अनिल दादा जगताप यांच्या प्रचाराची धुरा.

बीड: आज नवगण राजुरी येथून गणरायाचे दर्शन घेऊन अनिल दादा जगताप यांना पाठिंबा जाहीर करत विविध ओबीसी समाज संघटनानीं अनिल दादा जगताप यांना जाहीर पाठिंबा दिला.अनिल दादा जगताप यांची मनोज दादा जरांगे पाटील यांचे कट्टर समर्थक व मराठा आंदोलक तथा सर्व सामान्य जनतेचा हक्काचा माणूस अशी ओळख प्रचलित असलेले विधानसभा उमेदवार असून सध्या परिस्थितीत बीड विधानसभेसाठी अनेक उमेदवार आपले नशीब आजमावित असताना जाती-जातीत तेढ निर्माण करण्याचे काम क्षीरसागर कुटुंबाकडून जाणीवपूर्वक केले जात आहे या सर्वाला चाप



म्हणून , सर्व समाजाला सोबत घेऊन चालणारे नेतृत्व म्हणून सर्व परिचित असलेले उमेदवार अनिल जगताप यांना ओबीसीतील विविध समाजातील लोकांनी निवडून आणण्यासाठी आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे .बीड विधानसभा मतदारसंघातील शहर, खेड्यापाड्यात जाऊन सर्वांनी आपापल्या समाजातील समाज बांधवांना अनिल दादा जगताप यांना निवडून देण्यासाठीएकजुटीने मतदान करावे अशी आग्रहाची विनंती करत प्रचाराची धुरा ओबीसी समाज बांधवांनी सांभाळली आहे. ओबीसी समाजाने घेतलेल्या या भूमिकेमुळे अनिल दादा जगताप यांची बाजू भक्कम झाली असून विजय निश्चित मानला जात असल्याची चर्चा सुरू झाली आहे. याप्रसंगी माळी समाजाचे लक्ष्मण दादा ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली ओबीसी क्रांति परिषद राष्ट्रीय अध्यक्ष किरण चव्हाण, आलोक फटाले, मनोज उर्फ राजाभाऊ चव्हाण, नावी समाज मधुकर वैद्य, संजीव भारती हे परिश्रम घेत आहेत.

## क्षीरसागर मुक्त बीड करण्यासाठी अनिल दादा जगताप योग्य उम्मेद्वार - शेख शफीक ,सय्यद जावेद

बीड (प्रतिनिधी) बीड हे क्षीरसागर मुक्त करण्यासाठी बीड विधानसभेमध्ये अनिल जगताप योग्य उमेदवार आहे व त्यांना जरांगे पाटलांचे ही समर्थन आहे महणून मतदार संघातील जनतेने आपलं अमुल्य मत देऊन त्यांना विजयी करावे असे आवाहन माजी नगरसेवक शेख शफीख व सय्यद जावेद (टाटा) यांनी केले आहे.




शफीक भई असे म्हणतात की विधानसभे मध्ये क्षिरसागर मुक्त बीड झाले तर सत्तेपासून बीड शहरात दूर असलेला मुस्लिम व दलित समाजास बीड शहरात सत्तेचा वाटा मिळू शकतो म्हणून खास करूण दलित, मुस्लिम समाजाने अनिल जगताप यांना मतदान करावे जेने करूण बीड शहरात क्षीरसागरांची हुकुम शाही संपेल. असे पत्रक शेख शफीकभाई व सस्यद जावेद भाइ यानी काढले आहे.

## निवडून द्या, महेबूब शेख पुढचे पाच वर्षे सेवक बनून काम करतील खा.सुप्रीया सुळे यांचे मतदारांना आश्वासन

### चालू भाषणात साधला संवाद

खा.सुप्रिया सुळे यांचे भाषण सुरू असताना त्यांनी जनतेला सवाल केला. यावेळी गर्दीत बसलेले दासूपंत लवांडे यांच्याशी त्यांनी संवाद साधला. लवांडे यांनी शरद पवार यांचे बंधू अप्पासाहेब पवार यांची आठवण काढली. यावेळी त्यांनी असे जेष्ठ लोक आपल्या सोबत आहेत, त्यामुळे आपला विजय होईल, असा विश्वासही सुप्रीया सुळेंनी व्यक्त केला.



आष्टी: शरदचंद्र पवार ज्यांच्या मागे, त्यांच्याच मागे ही जनता असते. याठिकाणी तुतारी वाजविणारा माणूस हे चिन्ह आपले असून महेबूब शेख यांना निवडून द्या. महेबूब हे आमदार झाल्यावर इथे पाच वर्षे ते सेवक म्हणून काम करतील, असे आश्वासन राष्ट्रवादीच्या नेत्या खा.सुप्रिया सुळे यांनी केले. कडा येथे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार महेबूब शेख यांच्या प्रचारार्थ जाहिर सभेचे आयोजन केले होते. यावेळी व्यासपिठावर उमेदवार महेबूब शेख, खा.बजरंग सोनवणे, खा.निलेश लंके, माजी आ.उषा दराडे, तालुकाध्यक्ष परमेश्वर शेळके, अमोल तरटे, कॉँग्रेसचे तालुकाध्यक्ष रविंद्र ढोबळे, महिला जिल्हा उपाध्यक्ष मिनाक्षी पांडूळे, सुनिल नाथ यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना खा.सुळे म्हणाल्या, महेबूब आमदार होणारच आहे, परंतु त्याआधी माझ्या काही अटी आहेत. ते पुढील पाच वर्ष इथले सेवक असणार आहेत, या जिल्ह्यातील दडपशाही बंद झाली पाहिजे, यासाठी ते काम करतील. आम्ही कोणालाही घाबरत नाहीत. आज विरोधात लढत असले तरी मेहबूबने समोरच्या उमेदवाराचे नाव घेतले. बाळासाहेब आजबे यांच्या कामाचा उल्लेख केला. विरोधक असताना चांगल्याला चांगले म्हणण्याची आमची संस्कृती आहे. येणाऱ्या काळात बीडला एअरपोर्ट करण्यासाठी आपण ताकतीने उभा राहू, येथील विकासासाठी आम्ही कमी पडणार नाहीत. भाजपातील मित्रपक्ष रडीचा डाव खेळत आहेत. पण जिल्हा नेहमी पवार साहेबांबरोबर उभा राहतो.या जिल्ह्यात काही लोक चमत्कारी आहेत.मागील भाई पवार साहेबांमुळेच निवडून आले होते. पवार साहेब ज्यांच्या मागे त्यांच्याच मागे ही जनता असते. जनता आमच्याबरोबर होती म्हणून मी आणि अमोल कोल्हे निवडून आले. आम्ही धमक्या देत नाही आणि कोणाला घाबरत पण नाही. आदर करू पण दडपशाही खपवून घेतली जाणार नाही. कोणी बोगस मतदान करत असेल तर एक रेकॉर्डिंग मला पाठवा. त्यांचा करेक्ट कार्यक्रम मी केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. याठिकाणी बजरंग सोनवणे यांना तुम्ही खासदार म्हणून निवडून दिले. यापुढे जिल्ह्यात सर्वत्र तुतारी वाजेल. अगदीजेव्हा बजरंग सोनवणे साखर कारखाना काढणार तेव्हा पण तुतारी वाजणार आहे. आज साहेब पुन्हा पावसात भिजले. पुन्हा महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे, असेही त्या म्हणाल्या.

## विकास हीच जात आणि विकास हाच धर्म सिद्ध करण्यासाठी डॉ.योगेश क्षीरसागर योग्य उमेदवार - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर



बीड (प्रतिनिधी)दि.१५ : विना मोबदला घरपोच सेवा ही आमची काम करण्याची पद्धत आहे. विकास हीच जात आणि विकास हाच धर्म सिद्ध करण्यासाठी डॉ.योगेश क्षीरसागर योग्य उमेदवार आहे, त्यामुळे घडीच्या बटनावर मतदान करून त्यांना प्रचंड बहुमताने विजयी करा, असे आवाहन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.शिरूर कासार तालुक्यातील रायमोह येथे शुक्रवारी (दि.१५) डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ आयोजित संवाद दौ-यात बोलत होते. यावेळी त्यांनी स्पष्ट केले की, एकदा निर्णय झाला की बाकीच्या चर्चेला पूर्णविराम मिळतो. मतदारसंघाची तुटलेली घडी पूर्ववत करण्यासाठी महायुतीचे अधिकृत उमेदवार योगेश क्षीरसागर यांना निवडून देणे अत्यावश्यक आहे. व्यासपीठावर जगदीश काळे, अशोक हिंगे, प्रा.जगदिश काळे, सुभाष क्षीरसागर, सुलेमान पठाण, सुधाकर मिसाळ, जयश्रीताई मुंडे, गणेश घोलप, प्रकाश ईगळे, उषाताई सरवदे, मिनाताई उगलमुगले, अक्षय रनखांब, शरद ढाकणे, भगवान पाखरे, माधवराव मोराळे, गहिनीनाथ पाखरे, संजय सानप, सतिश काटे, नवनाथ सानप, वसंत सानप, अभिजीत खाडे, शिवमुर्ती सानप,यांसह अनेक नेत्यांनी योगेश क्षीरसागर यांच्या विजयासाठी मतदारांना प्रोत्साहित केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी सभापती सुधाकर मि साळ यांनी केले. आभार प्रदर्शन सुलेमान पठाण यांनी मानले. यावेळी रायमोह परिसरातील हजारो कार्यकर्ते व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मराठा आरक्षणाचा मांडला मुद्दा

गणेश घोलप यांनी महायुती सरकारच्या मराठा आरक्षणाच्या निर्णयाचे कौतुक करताना सांगितले की, योगेश क्षीरसागर यांना पाठिंबा देऊन महाराष्ट्राच्या नेतृत्वासाठी जयदत्त अण्णांसारख्या वटवृक्षाला मजबूत करा, असे आवाहन त्यांनी केले.

### योगेश क्षीरसागरांचा विजय निश्चित

अशोक हिंगे म्हणाले, गेल्या निवडणुकीत आम्हाला हिरा दिल्याचे सांगितले गेले, पण तो निखारा ठरला. त्यामुळे आमचा विकास खुंटला. यावेळी जयदत्तअण्णांनी योग्य निर्णय घेत योगेश क्षीरसागर यांचा विजय निश्चित केला आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार १६ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



## “लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी ||”

‘ मराठी ‘ माझी मातृभाषा जी मला अगदी आईसमान आहे. ज्याप्रकारे आईने जन्म दिला त्याचप्रकारे माझ्या विचारांना जन्म देणारी ही माझी आई. ३ ऑक्टोबर २०२४ ला घटस्थापनेच्या शुभ मुहूर्तावर माझ्या या मायबोलीला ‘ अभिजात भाषेचा ‘ दर्जा प्राप्त झाला, जणू मराठीच्या कलशाची अभिजात घटस्थापना होऊन मराठीला अखंड सौभाग्य लाभले आणि मराठीचा दर्जेसाठीचा संघर्ष अखेर संपला. खऱ्या अर्थाने मराठी समृध्द झाली. या दर्जेसाठी गेल्या कित्येक वर्षांपासून लढा सुरू होता. हो, माझी मराठी १५०० ते २००० वर्षे प्राचीन आहे, तिचे साहित्य तिच्यासाठी मौल्यवान वारसा आहे, मराठीला अस्सल साहित्यांची परंपरा आहे, म्हणून माझी मराठी आज अभिजात होऊ शकली आहे.
“ माझा मराठीची बोलू कौतुके
परि अमृतातेही पैजासी जिंके ||”
असे म्हणत संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेविषयीचा अभिमान, मराठीची महती व्यक्त केली आणि आज अमृतासमान असलेल्या मराठीला तिचा दर्जा मिळाला.

ज्ञानेश्वरांनाही ज्या भाषेत ज्ञानेश्वरी लिहाविशी वाटली ती म्हणजे मराठी, संतांच्या अभंगाची भाषा म्हणजे मराठी, लेखकांची लेखणी म्हणजे मराठी.....! मराठी भाषेतील सर्वच कवींनी, लेखकांनी मराठी ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले. मराठी ही काल-परवा जन्माला आलेली भाषा नाही. मराठी भाषेला हजारो वर्षांचा समृध्द व श्रीमंत इतिहास आहे. मराठीत विपुल ग्रंथसंपदा आहे आणि त्या श्रेष्ठ सहित्यकृतींमधे सातत्यपूर्ण रीतीने भर पडतच आहे.

मराठीच्या अनेक बोलीभाषा आहेत. वऱ्हाडची वऱ्हाडी, कोकणची कोकणी, खान्देशची खान्देशी, नागपूरची नागपुरी, कोल्हापूरची कोल्हापुरी आणि बरेच.... या बोलीभाषांना त्यांचं स्थान मिळायला हवं, तरच आपली मराठी भाषा सर्वार्थानं वाढू शकेल. कुठलीच बोली ही अशुद्ध नाही. व्हय, कुठं गेलतास, न्हाई गा, कुठवरी पोहचलास हे बोलण्यात काय अशुद्ध. शुद्ध-अशुध्दतेच्या नादी लागून आपण आपली रसरशीत, जोरदार भाषा टाकून देतोय. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा ती पुरातन भाषा आहे हे सिद्ध झाल्याने मिळाला आहे. आज जी प्रमाण भाषा आपण बोलतोय ती अश्याच बोलीभाषांचा विकास होत आपल्यासमोर आली आहे आणि त्यात अजूनही बदल होतोय यात शंका नाही.

जागतिकीकरणाच्या झंझावातात आधीच इंग्रजाळलेल्या आपल्या संस्कृतीस पश्चिमी विचार प्रभावी वाटू लागले आहेत. इंग्रजी भाषेचा अत्यंत प्रभावी पगडा जनमानसावर पडला आहे. मराठी पालक सुद्धा आपल्या मुलांशी घरी इंग्रजीत किंवा हिंदीत बोलतात, काळानुसार ते गरजेचेही आहे परंतु यामुळे आपल्या मराठीचे भवितव्य अंधारात चालले आहे. आपल्याला मराठीचे बीज जर पुढल्या पिढीत पेरायचे असेल तर मराठीत बोलावेच लागेल. मराठी असलेल्या पुस्तकांचे वाचन करावे लागेल आणि मराठीला समृध्द करण्यासाठी आपल्या लिखाणातून थोडा वाटाही द्यावा लागेल. कारण येणाऱ्या काळात मराठी भाषेचे अस्तित्व टिकवून ठेवणे, ही मराठी भाषिक म्हणून आपली जबाबदारी आहे.

मराठी भाषा संवर्धनाचा विचार करताना आपण संवर्धन करणार आहोत हे प्रथम गृहीत धरले पाहिजे. जास्तीत जास्त लोकांनी जास्तीत जास्त ठिकाणी मराठी भाषा बोलली पाहिजे. जेथे जेथे दोन व्यक्तींना मराठी येते तेथे तेथे बोलण्याचे माध्यम मराठीच असले पाहिजे. शासन दरबारी मराठी संवर्धनासाठी प्रयत्न सुरू आहे. न्यायालयीन भाषा मराठी करण्याकडे शासन पुढे आहे. या सर्व गोष्टींचा उपयोग करून मराठी भाषिकांनी आपल्या भाषेच्या संवर्धनाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली पाहिजे.

आपल्या मराठीस मोठी संत परंपरा लाभली आहे. तसेच मोठ्या समाजसुधारकांचा महाराष्ट्र आहे, यामुळे अध्यात्म, सामाजिक विचार या क्षेत्रांमध्ये मराठीचे संवर्धन चांगल्या प्रकारे करता येऊ शकते. माझे पहिले पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर अनेकांनी मला म्हटले की,”मला पण पुस्तक प्रकाशित करण्याची इच्छा आहे”,”माझ्याकडे भरपूर लिहून आहे पण प्रकाशित केले नाही.” त्यांना माझे एकच म्हणणे आहे, “निष्क्रियपणे नुसते हळहळत बसण्यापेक्षा आपण ठोस पावले उचलली पाहिजेत. आपल्या मराठी भाषेवरील प्रेम हे सापेक्ष व नकारात्मक असता कामा नये.” जागतिक स्तरावर मराठीचा प्रभाव पाडण्यासाठी उच्च दर्जाच्या अफाट वाचनाची गरज असून उत्तमोत्तम साहित्य मराठीतून आणले पाहिजे. उत्साहवर्धक वाङ्:मयीन वातावरण निर्माण केले पाहिजे. महाराष्ट्राचे महत्त्व मराठी भाषेच्या विकासातच आहे. मराठी भाषेची जडणघडण, प्रादेशिक बोलींमधील विविधता जपण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करायला हवे. मराठी भाषेच्या विकासार्थ जास्तीत जास्त दर्जेदार लिखाण केले पाहिजे. मराठी ही माझी आहे आणि तिच्या विकासातच माझा विकास आहे, हे आपण सदैव लक्षात ठेवायला हवे. केंद्र सरकारने घेतलेला ‘अभिजात भाषेचा’ निर्णय म्हणजे सर्व मराठी भाषाप्रेमींसाठी एक आनंदाचा क्षण आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी प्रयत्न करणाऱ्या प्रत्येकाचे खूप खूप धन्यवाद व अभिनंदन ! मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे, आपल्याला नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत. त्या संधीचा जास्तीत जास्त फायदा आता आपण करून घ्यायला हवा. जेणेकरून आपली मराठी भाषा अधिक समृध्द आणि प्रवाही होईल. म्हणूनच ह्या आनंदाच्या क्षणाबरोबर आपल्यावर एक जबाबदारीही आलेली आहे.

# कविता आणि मी: एक समग्र अवलोकन

आतापर्यंत आपण कथा वाचल्या, कादंबऱ्या वाचल्या, ललित लेख संग्रह आणि असे इतर अनेक साहित्य प्रकार वाचले असतील. पण ‘ कविता ‘ या साहित्य प्रकाराची मीमांसा करणारा, कवितेवर भाष्य करणारा, कवितेच्या व्याख्याचा, रुपांचा चर्चात्मक आढावा घेणारा माहितीपर लेख संग्रह तसा आतापर्यंत क्वचितच वाचनात आला असेल. ही कमतरता पूर्ण करण्यासाठी कवी लेखक प्रा. डॉ अरुण म्हात्रे लिखित ‘ कविता आणि आपण ‘ हा शारदा प्रकाशन तर्फे प्रकाशित लेख संग्रह वाचनात आला.

“कविता आणि मी” हे अरुण म्हात्रे यांनी रचलेले पुस्तक केवळ एक साहित्यकृती नसून, ती एका संवेदनशील मनाच्या अनुभूतींचा प्रवास आहे. कविता ही फक्त शब्दांची मांडणी नसते; ती हृदयाच्या अंतरंगातून उमललेली भावना असते. या भावनांची ओळख करून देत, लेखक म्हात्रे आपल्या वाचकांना काव्याच्या एका आगळ्या विश्वात घेऊन जातात, जिथे शब्द प्रत्येक वेळी नवीन अर्थ घेतात आणि मनाला नवी उभारी देतात.

या पुस्तकात लेखकाने काव्याचे विविध पैलू, त्याची जडणघडण, त्यातील गूढता, आणि त्याचा मानवी जीवनावर होणारा परिणाम यांचा सखोल अभ्यास सादर केला आहे. प्रत्येक प्रकरण वाचताना, वाचकांना लेखकाच्या मनातील कवितेचे स्वरूप, तिची घडण, आणि ती अनुभवताना मनात उमटणारे भाव विचार करण्यास प्रवृत्त करतात. प्रकरणांमधील उदाहरणे आणि कवितांचे तात्त्विक वर्णन वाचकांना भावनांच्या खोल तळाशी घेऊन जातात.

या पुस्तकात लेखकाने कवितेच्या मानसिक आणि भावनिक परिणामांची चर्चा केली आहे. कविता हे केवळ मनोरंजनाचे साधन नाही तर ती विचारप्रवर्तक शक्तीही आहे, असे मत त्यांनी मांडले आहे. एका कवितेच्या शब्दांमधून समाजाला जागरूक करण्याची ताकद कशी असते, हे त्यांनी उत्तमरीत्या स्पष्ट केले आहे.

पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे लेखकाची ओघवती भाषा आणि त्यांची विचारप्रवर्तक शैली! अरुण म्हात्रे यांची भाषा सरळ, ओघवती, आणि रसाळ आहे. ती वाचकाला थेट हृदयाशी जोडते. यातील शब्दांची ताकद आणि काव्याच्या प्रत्येक ओळीतील भावनेचा आविष्कार हेच या पुस्तकाचे वेगळेपण आहे. अगदी पुस्तकाच्या सुरुवातीला त्यांनी त्यांच्या पत्नीला लिहिलेल्या अर्पण पत्रिकेतील त्यांच्या भावनिक शब्दातूनव याची प्रचिती येते.

पुस्तकातील अनुक्रमणिकेत सुरुवातीलाच ‘ कविता म्हणजे काय ‘ या प्रश्नाचे उत्तर दिलेले आपल्याला वाचायला मिळते. या प्रश्नाचे उत्तर आहे लेखकाने कवितेच्या रूपातच दिलेले आहे. लेखक कवितेला उद्देशून लिहितात...
‘ बाई ग... तू म्हणजे आमच्या आतल्या धडधडीचं शब्दात भाषांतर तू म्हणजे आम्हाला बसलेल्या चटक्याचं सुटक्यात रूपांतर!’
लेखक पुढे लिहितात,

कविता म्हणजे आमची माय,
कविता म्हणजे मनाची साय
कविता असते जिथली तिथे..
फक्त तुमचे वळतात पाय
असे मोजक्या शब्दात डॉ. म्हात्रे यांनी कवितेचा त्यांना उमगलेला अर्थ या पहिल्या भागात दिला आहे.

पुस्तकाच्या ‘ कविता : किती ओळखीची गोष्ट ‘ या दुसऱ्या भागात कवितेसंबंधी अजून काही माहिती काव्यमय भाषेत कवीने लिहिलेले आहे. ते लिहितात.... एखाद्या कथाकाराला , कादंबरीकाराला, नाटककारालाही सर्वात आधी कविताच भेटते. याचे कारण ते असे सांगतात, की कविता हा वांग्मयाचा भाग म्हणून आयुष्यात येत नाही तर काव्य हे संवेदनशील मनाचे प्रतिबिंब असते. आईचे प्रेम, वडिलांची वत्सलता, घराचा भक्कम आधार , पहिल्या पावसाचा मन शांत करणारा शिडकावा , आकाशाची भव्यता , दुःखाची गहिरे मळभ या आणि आयुष्याच्या अशा अनेक चढ उतारातून जगत असताना मनाच्या त्या त्या क्षणी अनुभवलेल्या जाणिवा ह्या कवितेतूनच सहजतेने काव्यात उमटतात. चारोळी या काव्य प्रकाराबाबतही त्यांनी स्पष्टीकरण केले आहे. उदाहरणादाखल त्यांनी काही चारोळ्याही दिल्या आहेत.

‘ कविता माझी स्वयंसारणी ‘ या तिसऱ्या प्रकरणात लेखकाने प्रख्यात कवींच्या काही कवितांचे दाखले दिलेले आहेत. ते लिहितात या साऱ्या कवितांच्या अलीकडे, पलीकडे एक जाणिवांचे विश्व आहे. मनाला कल्पनांचे पंख जोडायला या कवितांचा फार उपयोग होतो. ‘ कवितांचे अध्यात्म’ या प्रकरणात ते लिहितात, कविता लिहिण्यासाठी जसे शब्द लागतात तसे त्या शब्दांच्या मागचे आशियाचे सर्व धागे हळुवारपणे पण अगदी परखडपणे हाताळावे लागतात. या कविता लिहिताना नेमके शब्द वापरावे लागतात आणि ते शब्द हृदयातून स्फुरणे गरजेचे असते. कवितेचे अध्यात्म काय हे समजावताना लेखक कवी म्हात्रे म्हणतात, कविता सुचण्याचा क्षण हा साक्षात्काराचा क्षण असतो. ध्यानीमनी काही नसताना कवी कवयित्रीला काही नवे सुचते तो असतो सृजनाचा क्षण! या प्रकरणात कवितेतील अध्यात्मिकता आणि गूढता यांचा विचार केला आहे. कविता हे केवळ वाचनासाठीचे माध्यम नसून ती आत्म्याला स्पर्श करणारी अनुभूती आहे, हे लेखकाने समर्थपणे मांडले आहे. या पुस्तकातील सर्वच लेख / प्रकरणे वाचनीय आणि माहितीपूर्ण आहेत. उदाहरणादाखल सांगायचे तर राहून गेलेल्या कविता, कवीचे चारित्र्य, कविता आणि गाणे, मराठी गझल, कविता माणसं जोडणारी चळवळ हे आणि असे सर्व लेख आवर्जून, वेळात वेळ काढून वाचावे असे आहेत. कविता या साहित्य प्रकाराबाबतीत सर्वसामान्यांना अनेक प्रश्न पडतात. उदाहरणार्थ, कविता म्हणजे नक्की काय ? ती नक्की सुचते कशी? कोणते अंतर्गत आणि बाह्य घटक कवितेवर परिणाम करतात? काव्य लेखनाची आणि काव्य वाचनाची परंपरा कोणती आहे? काव्य वाचनाचे आपल्या समाजातले स्थान काय आहे? समाजावर त्याचा नक्की किती, कोणता आणि काय प्रभाव पडतो? अशा अशा सर्व मुद्द्यांचा उहापोह करणारे हे पुस्तक आहे.

आंतरिक आणि बाह्य अशा कवितेच्या दोन्ही अंगांचा परामर्श पुस्तकात लेखकाने केला आहे. नव्वदोत्तरी काळापासून ते आत्ताच्या तांत्रिक ए आय युगापर्यंत सातत्याने बदलत असलेल्या काव्य विश्वाचा आढावा या पुस्तकात घेतला आहे. सर्वसामान्यांच्या मनात कवितेविषयी अनेक प्रश्न असतात.. कविता तर सर्वत्र वाचायला मिळतात पण कवितेसंबंधित या प्राथमिक प्रश्नांची उत्तरे मात्र वाचकांना किंवा नव कवींना मिळत नाहीत. आपल्या मनातले हे प्रश्न कोणाला विचारायचे या शंकांचे निरसन कोण करेल या संभ्रमात असणाऱ्या प्रत्येकासाठी हे पुस्तक एक ‘ गाईड ‘ असणार आहे. हे पुस्तक नवोदित कवी, साहित्यप्रेमी आणि अनुभवी कवींसाठी मार्गदर्शक ठरणारे आहे. यातून कवितेचे विविध कंगोरे, तिच्या रचनेतील सूक्ष्म गोष्टी, आणि तिचा प्रभाव वाचकाला नव्या दृष्टीकोनातून पाहता येणार आहे. “कविता आणि मी” हे पुस्तक एक भावनाप्रधान प्रवास आहे ज्यात अरुण म्हात्रे यांनी आपल्या कवितेच्या प्रेमाला वाचकांसमोर उलगडले आहे. हा प्रवास वाचकाला फक्त कविता वाचायला शिकवत नाही तर तिला समजून घेण्याची, अनुभवण्याची, आणि तिच्यात रमण्याची संधी देतो. कवितेवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाला ‘ कविता आणि आपण ‘ हा माहितीपूर्ण लेख संग्रह नक्की आवडेल असा आहे. हा संग्रह सर्व प्रमुख पुस्तकालयात तसेच शारदा प्रकाशनच्या वेबसाईट वर विक्रीसाठी उपलब्ध आहे. न मिळाल्यास अवश्य संपर्क करा.

**प्रा.प्रज्ञा पंडित**
**लेखिका समीक्षक**
**ठाणे**
**9320441116**

# जिल्हा माहिती कार्यालय असुन अडचण नसुन खोळंबा ; निवडणुकीसाठी माध्यम संनियंत्रण कक्ष केवळ नावालाच :- डॉ.गणेश ढवळे

**बीड प्रतिनिधी ,**

बीड:- ( दि.१५ ) जिल्हा माहिती कार्यालयाकडून मतदारांसाठी बातम्यांच्या माध्यमातून व्यापक पद्धतीने जनजागृती होत नसुन विधानसभा निवडणुकीसाठी स्थापन करण्यात आलेला माध्यम संनियंत्रण कक्ष केवळ नावालाच असुन कक्षा द्वारे निवडणुकीच्या संदर्भातील बातम्या माध्यमांना देणे आवश्यक असताना यात हलगर्जीपणा होत असुन यामुळे मतदानाची टक्केवारी घसरण्याची शक्यता असुन संबंधित प्रकरणात जबाबदार अधिका□्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशी तक्रार सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी बीड यांना ईमेल द्वारे केली आहे.मतदारांनी मतदान यादीत नाव कसे पहावे, कोठे शोधावे याची माहिती बातम्यांच्या माध्यमातून देणे आवश्यक असुन मतदारांसाठी मतदान केंद्रावर कोणत्या सुविधा देण्यात येणार आहेत, सुविधा न मिळाल्यास मतदारांनी कोठे तक्रार करावी ही माहिती माध्यमांद्वारे सर्व सामान्य मतदारांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे.सीव्हीजील अॅपवर किती तक्रारी आल्या व किती निकाली काढल्या याची माहिती प्रसिद्धी माध्यमांना देणे गरजेचे आहे. गृहमतदान,आधिका-यांनी केलेल्या मतदानाची आकडेवारी बातम्यांद्वारे प्रसिद्धी माध्यमांना देणे आवश्यक आहे.आधिकारी व कर्मचा-्यांना त्यांचे मतदान कधी आहे, कोणत्या कालावधीत मतदान करावे याची माहिती देणे आवश्यक आहे.शासकीय बातम्या प्रसार माध्यमांद्वारे प्रसिद्ध करवुन सर्व सामान्यांत जनजागृती करणे हे मुळ काम जिल्हा माहिती कार्यालयाचे आहे. परंतु ज्या कामासाठी कार्यालय चालविले जाते ते कामच होत नाही. विधानसभा निवडणुकीसाठी माध्यम संनियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.या कक्षा द्वारे निवडणुकीच्या संदर्भातील बातम्या माध्यमांना देणे आवश्यक आहे मात्र या कामांमध्ये संबंधित अधिकारी व कर्मचारी हलगर्जीपणा करताना दिसत असुन यामुळे मतदानाची टक्केवारी घसरण्याची शक्यता नाकारता येत नाही.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार १६ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# बीडमधील व्यापा-यांच्या प्रश्नांची जाण असलेले उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांना विधिमंडळात पाठवा- शिवसेना नेते, उद्योग मंत्री ना. उदय सामंत

दि.१५ : शेतकरी, व्यापारी, उद्योजकांमुळे महाराष्ट्र प्रगतशील राज्य आहे. महाविकास आघाडीच्या नेत्याने खालच्या पातळीवर जाऊन टीका करत राज्यातील सर्व व्यापा-यांना भेसळखोर म्हटले. त्यामुळे व्यापा-यांनी अशा नेत्यांना निवडणुकीत त्यांची जागा दाखवावी. आम्ही कायम व्यापारी, उद्योजकांचा सन्मान केला. बीडमधील व्यापा-यांच्या प्रश्नांची जाण असलेले उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांना विधिमंडळात पाठवा, असे आवाहन शिवसेना नेते, उद्योग मंत्री ना.उदय सामंत यांनी केले.महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ शहरातील वैष्णव पॅलेस येथे शुक्रवारी (दि.१५) ना.उदय सामंत यांनी व्यापारी संघटनांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते.व्यासपीठावर महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर, दिनकर कदम, विलास बडगे, लाडकी बहीण योजना समितीचे बीड विधानसभा अध्यक्ष अमर नाईकवाडे, राणासिंग चव्हाण, राजेंद्र क्षीरसागर, भास्कर जाधव, नानासाहेब काकडे, बबनराव गोरे, युवासेनेचे मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, सुमित कोळपे, अजय सुरवसे, सूरज चव्हाण, बीड जिल्हा व्यापारी महासंघ, शहर व तालुका असोसिएशनचे पदाधिकारी आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना ना.उदय सामंत म्हणाले, माझे व डॉ.योगेश यांचे कौटुंबिक संबंध आहेत. त्यांची निवडणुकीतील घड्याळ ही निशाणी जरी चार नंबरवर असली तरी डॉ.योगेश क्षीरसागर हा उमेदवार एक नंबर आहे. शेतकरी, व्यापारी, उद्योजकांमुळे महाराष्ट्र प्रगतशील राज्य आहे. महाविकास आघाडीच्या नेत्याने व्यापा-यांवर खालच्या पातळीवर जाऊन टीका करत राज्यातील सर्व व्यापा-यांना भेसळखोर म्हणाला. त्यामुळे व्यापा-यांनी अशा नेत्यांना निवडणुकीत त्यांची जागा दाखवावी. मी देखील व्यावसायिक आहे, आमचा पारंपारिक व्यवसाय ठेकेदारी आहे. ठेकेदारी करणे चूक नाही, ठेकेदारांकडून वसुली करणे चुकीचे, असाच प्रकार बीडमध्ये घडला आहे, असे म्हणत आ.संदीप क्षीरसागर यांच्यावर निशाणा साधला. समोरचा उमेदवार नेमका कोणत्या पक्षात आहे? हे त्यालाच माहिती नसते. तो कधी म्हणतो शरद पवार, उध्दव ठाकरे तर कधी मनोज जरांगे पाटील यांचे नाव घेतो. आधी त्यांनी एकदा ठरवावे कुणाच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवायची आहे. निवडून आल्यास दंड थोपटून, दादागिरी करून चालत नसते, असेही ते म्हणाले. क्षीरसागर कुटुंबाचे सर्व क्षेत्रात मोठे कार्य आहे. कुटुंबाचा नावलौकिक करण्याऐवजी इथल्या समोरच्या उमेदवाराने नाव घालण्याचा प्रयत्न केला. परंतु जयदत्त क्षीरसागर, डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्या पावलावर पाऊल




ठेवून डॉ.योगेश क्षीरसागर हे काम करत आहेत. ते विधिमंडळात माझ्यासोबत येणारच आहेत, त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार या सर्वांच्या वतीने मी बीडचे विकासाचे प्रश्न सोडवतो, असा शब्द देतो, मात्र तुम्ही बीडकर डॉ.योगेश यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा. बीडमध्ये व्यापार पेठ, एमआयडीसी पाहिली, यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी स्वतःसाठी काही मागितले नाही. तुमच्या प्रश्नांची मांडणी करत होते. अशी प्रश्नांची जाण असलेले डॉ.योगेश क्षीरसागर यांना विधिमंडळात पाठवा. यापूर्वी मी सुद्धा घड्याळाचा उमेदवार होतो. जेवताना, झोपताना, उठताना आपण घड्याळ पाहतो. त्यामुळे घड्याळाला अनन्यसाधारण महत्व आहे, अगदी तसेच महत्त्व बीडचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांना आहे. बीड विधानसभा मतदारसंघात लाडक्या बहीण योजनेचा लाभ ९८ हजार महिलांना मिळाला. त्यामुळे आपल्या उमेदवाराला ९८ हजारच्या पुढे मते मोजायची आहेत. त्यामुळे डॉ.योगेश क्षीरसागर यांचा विजय निश्चित आहे, असा विश्वास ना.उदय सामंत यांनी व्यक्त केला. यावेळी महायुतीचे पदाधिकारी, व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीडच्या व्यवसायाला गती देणा-या सुविधा उपलब्ध करून देऊ : डॉ.योगेश क्षीरसागर

बीडच्या आमदाराने काहीच काम केले नाही म्हणून त्यांची ओळख आहे. सर्वसामान्य नागरिकांसह व्यापा-यांच्या प्रश्नावर त्यांची कायम उदासीनता राहिली. त्यांना व्यवसाय, उद्योग, एमआयडीसीसाठी विशेष काही करता आले नाही. या भागातील रस्ते होणे गरजेचे आहेत. एमआयडीसीतून नाळवंडीकडे जाणारा मुख्य रस्ता नवीन सरकार येताच करून घेतला जाईल. एमआयडीसीमध्ये रस्ते सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्यासाठी प्रस्ताव दिलेले आहेत. रिंग रोडचा प्रश्न सोडवायचा आहे. व्यापा-्यांच्या प्रश्नासाठी मी विशेष लक्ष देईल. शहरातील व्यवसायाला चालना देण्यासाठी आपण घड्याळ चिन्हासमोरील बटन दाबून मला विजयी करावे, असे आवाहन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

## व्यापारी सुशिक्षित उमेदवाराच्या मागे : भास्कर जाधव

बीड शहर आणि मतदारसंघातील व्यापारी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासारख्या सुशिक्षित उमेदवाराच्या पाठीशी उभे राहतील. नवीन सरकार महायुतीचे येईल, तेव्हा बीडमध्ये व्यापारी भवन उभारावे, एमआयडीसीत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. व्यवसाय कर रद्द करून व्यापा-यांना दिलासा द्यावा, अशा मागण्या जिल्हा व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष भास्कर जाधव यांनी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडे केल्या.

# पाटोद्यात शनिवारी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटीलांची जाहीर सभा पाटोद्यात कोणत्या पक्षाला पडणार भगदाड चर्चा जोरात

पाटोदा / प्रतिनिधी आष्टी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे आष्टी विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार महेबुब शेख यांच्या प्रचारार्थ उद्या दि १६ नोव्हेंबर शनिवार रोजी सकाळी ९.३० वाजता पाटोदा येथील बाजार तळ येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची जाहीर सभा होणार असून या सभेस खा बजरंग सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. आष्टी विधानसभा मतदारसंघातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष शिवभुषण जाधव यांनी केले आहे.



आष्टी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार महेबुब शेख यांनी आष्टी विधानसभा मतदारसंघ पिंजून काढला असून युवक व सर्व सामान्य नागरिकांचा त्यांना मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. सदरील निवडणूक ही जनतेने हातात घेतली असल्याने महेबुब शेख यांचा विजय निश्चित झाला आहे. त्यांच्या प्रचारार्थ प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची पाटोदा येथे उद्या शनिवार सकाळी ९.३० वाजता बाजार तळ येथे जाहीर सभा होणार आहे. या सभेला प्रमुख पाहुणे म्हणून म्हणून खा. बजरंग सोनवणे यांची उपस्थिती राहणार आहे.आष्टी विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीच्या सर्व घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व सर्वसामान्य नागरिक, युवक, महिला , शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष शिवभुषण जाधव व पदाधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## उद्या कोणत्या पक्षाला भगदाड पडणार याकडे लक्ष

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या आत्तापर्यंत आष्टी मतदारसंघात दोन सभा होत झाल्या असून यामध्ये प्रामुख्याने मा.जि.प.अध्यक्ष डॉ शिवाजी राऊत,सहकार महर्षी रामकृष्ण बांगर,तर दि.१५ नोव्हेंबर रोजी होत असलेल्या संसदरत्न खा.सुप्रियाताई सुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत युवानेतृव तरूणाईच्या गळ्यातील ताईत मा.जि.प.सदस्य सतिष आबा शिंदे प्रवेश करणार असल्याने उद्या होत असलेल्या प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या जाहिर सभेतून कोणत्या पक्षाला भगदाड पडणार यांची चर्चा सध्या मतदारसंघातुन करण्यात येत आहे.

# मतदान, मतमोजणीच्या ठिकाणी कलम १६३ लागू

बीड, दि. 15 : भारत निवडणूक आयोगाने 15 ऑक्टोबर 2024 रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. सदर कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. तसेच विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 च्या अनुषंगाने 20 नोव्हेंबर 2024 रोजी मतदान प्रक्रिया होणार असून 23 नोव्हेंबर 2024 रोजी मतमोजणी होणार आहे. त्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाची निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मतदान केंद्र व मतमोजणीच्या ठिकाणी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 लागू करण्यात आल्याचे आदेश अपर जिल्हा दंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी निर्गमित केले आहेत. सदर आदेश निवडणुकीची कामे हाताळताना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये या दृष्टीकोनातून 20 नोव्हेंबर 2024 रोजी मतदानाच्या दिवशी व 23 नोव्हेंबर 2024 रोजी मतमोजणीच्या दिवशी सकाळी 06 वाजेपासून ते मतदान प्रक्रिया व मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अंमलात राहतील. तसेच प्रत्येक ईसमावर सदर आदेश तामील करणे शक्य नसल्यामुळे हे एकतर्फी आदेश ध्वनीक्षेपकावर पोलिसांनी जाहीर करून त्यास प्रसिद्धी द्यावी, असेही आदेशात नमूद आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 अन्वये मतदान केंद्राच्या ठिकाणापासून 100 मीटर व मतमोजणी केंद्राच्या ठिकाणापासून 200 मीटर परिसरातील सर्व पक्ष कार्यालय, उमेदवारांचे मंडपे, सर्व दुकाने इत्यादी तसेच मोबाईल, कॉडलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे इत्यादींच्या वापरावर बंदी घालण्यात येत आहे.

निवडणुकीच्या कामाव्यतिरिक्त इतर खाजगी वाहनांना प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. मतदान केंद्राच्या ठिकाणापासून 100 मीटर व मतमोजणी केंद्राच्या ठिकाणापासून 200 मीटर परिसरात नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना वगळून पाच किंवा पाचपेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. परंतु जे मतदार मतदानासाठी मतदान केंद्राच्या ठिकाणी रांगेत उभे असतील त्यांना आदेश लागू राहणार नाही.

मतदान केंद्र परिसरात ध्वनीक्षेपक वापरास, वाद्य वाजविण्यास व मिरवणुका काढण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. मतदान केंद्राच्या 100 मीटरच्या आत व मतमोजणी केंद्राच्या 200 मीटरच्या आत संबंधित पक्षाचे उमेदवाराचे चिन्हांचे प्रदर्शन करण्यास व निवडणूक कामकाजासाठी नियुक्त असलेल्या अधिकारी, कर्मचारी व मतदान करण्यासाठी आलेल्या व्यक्तींव्यतिरिक्त इतर व्यक्तींना वैध ओळखपत्र असल्याशिवाय प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. सदर आदेश निवडणूकीच्या कामकाजासाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाहीत, असेही आदेशात नमूद केलेले आहे.

******

# तुम्ही प्रदीप नाईक यांना आमदार करा मी लाल दिव्याच्या गाडीत बसवण्यासाठी पवार साहेबांकडे शिफारस करेन- खा.अमोल कोल्हे

## दोन अपक्ष उमेदवारांच्या पाठिंब्यासह दाभाडी, राजगड येथील सरपंचांचा आज पक्षप्रवेश

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड-किनवट : किनवट येथे महाविकास आघाडीचे उमेदवार प्रदीप नाईक यांच्या प्रचार सभा पार पडली विचार मंचावर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे स्टार प्रचारक तथा खासदार अमोल कोल्हे यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी त्यांनी तुम्ही किनवट माहूर मतदार संघातून प्रदीप नाईक यांना प्रचंड मताने विजयी करा त्यांना विधानसभेत लाल दिव्याच्या गाडीत बसवण्याचे काम शरद पवार साहेबांकडे मी त्यांची शिफारस करेल हा शब्द आज किनवट माहूर मतदार संघातील मतदारांना खासदार अमोल कोल्हे यांनी दिला तर तमाम मतदार संघातील जनतेने हात वर करून त्यांना एक मताने निवडून देण्याचं खासदार अमोल कोल्हे यांना आश्वासित केलं. तर ज्योतिबा खराटे यांनी आमदार भीमराव केराम यांची भर सभेत ऑडिओ क्लिप ऐकत त्यांच्या भ्रष्टाचाराविषयी पाढाच वाचला, तर स्टार प्रचारक नितेश कऱ्हाळे गुरुजी यांनी मोदी शहा व सध्याच्या गब्बर झालेल्या शासनावर आपली तोफ ठणकावली लाडक्या बहिणींनो सावध राहा ते तुमचे दिलेले पैसेही काढून घेतील अशा शब्दात सरकारवर त्यांनी जोरदार प्रतिकार केला. यावेळी विचार मंचावर आमदार खाजा बेग राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर , राष्ट्रवादीचे स्टार प्रचारक नितेश कऱ्हाळे भीमटायगर सेनेचे दादासाहेब शेळके शिवसेना उबाटा गटाचे विधानसभा प्रमुख ज्योतिबा खराटे ,कृष्णा पाटील आष्टीकर अनिल रुणवाल,मारुती दिवसे कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष सूर्यकांत रेड्डी माजी नगराध्यक्ष के मूर्ती





राष्ट्रवादीचे दिनकर दहिफळे गजानन मुंडे अनिल पाटील कराळे तालुकाध्यक्ष प्रकाश राठोड, समाधान जाधव ,विशाल जाधव व्यंकट भंडारवार, नारायण सिडाम, अरुण आळणे, प्रवीण मॅकलवार साजिद खान,फोरोज दोसानी, निरंजन केशवे बालाजी बामणे,राम पाटील, राजू सुरोशे राज, उपसरपंच बालाजी भरकड अमजद खान पठाण इमरान खान, दत्ता कसबे यांच्यासह महाविकास आघाडी चे व मित्र पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते असंख्य मतदार बांधव उपस्थित होते सभेचे सूत्रसंचलन दत्ता मोहिते यांनी केले.

# चेक न वटल्याने आरोपीस ६ महिने कारावास व १० लाख नुकसान भरपाई देण्याचे आदेश

बीड:- (प्रतिनिधी) (दि.१३-११-२०२४) या प्रकरणाची थोडक्यात हकीगत अशी आहे की, प्रकरणातील फिर्यादीने आरोपीचे घर खरेदी करण्या करिता आरोपीस इसार रक्कम रु.८,००,०००/- (आठ लाख रु.) दिलेले होते. सदरचा घर खरेदीचा करार पूर्ण होऊ न शकल्याने फिर्यादीने आरोपीस इसारापोटी दिलेली रक्कम रु.८,००,०००/- (आठ लाख रु.) ची मागणी केली असता, आरोपीने फिर्यादीस सदर रक्कमेचा धनादेश दिला होता. सदरचा धनादेश फिर्यादीने बँकेत वटण्यास जमा केला असता, तो न वटल्याने फिर्यादीने मा. न्यायालयात आरोपी विरुध्द एस.सी. सी.नं. ३५४/२०१९



हे प्रकरण दाखल केले होते.उपरोक्त प्रकरणात मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साहेब, बीड यांनी फिर्यादी तर्फे दाखल केलेले साक्षी पूरावे व फिर्यादी तर्फे करण्यात आलेला ॲड. विलास के. सगळे यांचा युक्तीवाद मा. न्यायालयाने ग्राह्य धरला व प्रकरणात आरोपी गणेश वसंतराव जगताप यास फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५ (२) नुसार निगोशिएबल इन्ट्रमेन्ट चे कलम १३८ अन्वये दोषी ठरवून आरोपीस ६ महिने कारावास व रु.१०,००,०००/- (दहा लाख रु.) नुकसान भरपाई देण्याचे आदेशीत केले. जर आरोपीने मुदतीत नुकसान भरपाई अदा न केल्यास १ महिने कारावासाची शिक्षा देण्याचे आदेशीत केले आहे.सदर प्रकरणात ॲड. विलास के. सगळे यांनी फिर्यादी दिपक गोरखनाथ हजारे यांच्या वतीने विधीज्ञ म्हणून काम पाहिले.

# विजय सिंह पंडित यांना विजयी करण्याचा कामखेडा गणातील नागरिकांचा निर्धार - रुपेश इंदुरे.

विजय सिंह पंडित यांना विजयी करण्याचा कामखेडा गणातील नागरिकांचा निर्धार - रुपेश इंदुरे.

**गेवराई प्रतिनिधी**

गेवराई विधासभा मतदार संघातील सर्वसामान्य जनतेच्या अडीअडीचणीला सातत्याने सामोरे जाणारे,जनहिताचे अनेक प्रश्न मार्गी लावणारे,जि.प.च्या माध्यमातून कामखेडा गणातील अनेक गावातील दलित वस्ती,सिमेंट रस्ते, सभामंडप,जल सिचन विहिर,लाईट, शेतक-यांच्या अडीअडचणी सोडवणारे व या पुढे विकासाचा राहिलेला अनुशेष भरून काढण्यासाठी सर्व नागरिकानी शिवछत्र परिवाराचे व राष्ट्रवादी कॉंग्रेस व महायुती चे तरुण तडफदार व सर्व समावेशक सामान्य जनतेचे व युवकांचे हृदय स्थान माजी जि.प.अध्यक्ष तथा गेवराई विधानसभा महायुतीचे अधिकृत उमेदवार



मा.श्री.विजयसिंह पंडित साहेब यांना घड्याळ या चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड बहुमतानी विजय करण्याचा निर्धार कामखेडा पंचायत समिती गणातील रुपेश इंदुरे यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांनी केला आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार १६ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# मनोज जरांगेंची तब्येत अचानक बिघडली, अंतरवालीमध्येच उपचार सुरू



मोठी बातमी समोर येत आहे. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची तब्येत पुन्हा एकदा बिघडली आहे. जरांगे पाटील यांना काल रात्रीपासून ताप, खोकला आणि सर्दीचा त्रास सुरू झाला आहे. जरांगे पाटील यांच्यावर अंतरवाली सराटीमध्येच उपचार सुरू करण्यात आले आहेत. काल रात्री त्यांना ताप आला, त्यानंतर त्यांना खोकला आणि सर्दीचा त्रास देखील सुरु झाला. त्यामुळे त्यांच्यावर आता अंतरवाली सराटीमध्ये उपचार सुरु आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी मोठा लढा उभारला. त्यांच्या आंदोलनानंतर सरकारनं मराठा समाजासाठी स्वतंत्र आरक्षण मंजूर केलं, मात्र मनोज जरांगे पाटील अजूनही मराठा समाजाला ओबीसीमधूनच आरक्षण मिळावं या आपल्या मागणीवर ठाम आहेत. त्यासाठी त्यांनी विधानसभा निवडणुकीत उतरण्याचा निर्णय देखील घेतला. विधानसभेसाठी त्यांनी मराठा, दलित आणि मुस्लिम समाजाची मोट बांधण्याचा प्रयत्न केला. जीथे उमेदवार निवडून येण्याची शक्यता आहे, तीथे उमेदवार देऊ, जिथे शक्यता नाही तीथे आमच्या मागण्यांचं जो समर्थन करेल त्या उमेदवाराला पाठिंबा देऊ अशी त्यांची भूमिका होती. मात्र त्यांनी ऐनवेळी निवडणुकीतून माघार घेतली. त्यानंतर आता त्यांनी आपली पुढची दिशा स्पष्ट केली आहे. मराठा समाज सुज्ञ आहे, त्यांना फार काही सांगण्याची गरज नाही. मी कोणत्याही पक्षाला पाठिंबा दिला नाही, त्यामुळे मराठा समाजाला वाटेल त्या उमेदवाराला ते पाडतील ज्याला निवडून आणायचं आहे त्याला निवडून आणतील. मात्र हे सर्व करत असताना आरक्षणाचा प्रश्न डोक्यात असू द्या, आपल्या विरोधात कोण आणि बाजूनं कोण हे लक्षात घ्या. गाव पातळीवर उमेदवाराचे मागणीला पाठिंबा दिल्याचे व्हिडीओ बनवा, मात्र ते व्हायरल करू नका असं आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजला केलं आहे.

# शब्द माझे तुझ्याचसाठी काव्यसंग्रह आणि मयूरस्पर्श चारोळी संग्रह प्रकाशन सोहळा थाटात संपन्न



सर्वपरिचित कवयित्री, समाज कार्यकर्त्या सौ. अश्विनी सचिन बोलके यांच्या शब्द माझे तुझ्याचसाठी या काव्यसंग्रहाचे आणि निवेदक, गायक अभियंता कवी मयूर महादेव पालकर यांच्या "मयूरस्पर्श " चारोळी संग्रहाचे प्रकाशन अभियंता भवन नवीन पनवेल येथे दिनांक ९ नोव्हेंबर २०२४ रोजी ज्येष्ठ साहित्यिक - सुप्रसिद्ध गझलकार ए.के. शेख तसेच प्रमुख मान्यवर म्हणून अखिल भारतीय साहित्य परिषद कोकण प्रांत अध्यक्ष - ज्येष्ठ पत्रकार श्री. दुर्गेश सोनार, कवयित्री, शिक्षिका सौ.मानसी नेवगी, साहित्यसंपदा संस्थापक वैभव धनावडे आणि सबोर्डीनेट इंजिनीअर असं असोशिएशनचे अध्यक्ष संजय ठाकूर अशा दिग्गज मान्यवरांच्या आणि आप्तेष्ट व कुटुंबियांच्या उपस्थितीत थाटात संपन्न झाला. दुर्गेश सोनार यांनी कवयित्री अश्विनी बोलके यांच्या 'शब्द माझे तुझ्याचसाठी' या पुस्तकाबद्दल,"या काव्यसंग्रहातील कविता सकस, सशक्त आणि सामर्थ्यशाली आहेत तसेच हा काव्यसंग्रह असला तरी संपूर्ण पुस्तक वाचून पूर्ण व्हायला दोन ते तीन महिने लागू शकतात,इतक्या त्या विचार करायला लावणाऱ्या आहेत." असे बोल व्यक्त केले. "मनास होणारा भावनांचा तरल स्पर्श म्हणजे मयूरस्पर्श", अशा शब्दांत कवयित्री मानसी नेवगी यांनी चारोळीकार मयूर पालकर यांच्या मयूरस्पर्श ' विषयी आपले मनोगत व्यक्त केले.जेष्ठ साहित्यिक आणि सुप्रसिद्ध गझलकार सन्माननीय ए. के . शेख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात कवयित्री अश्विनी बोलके आणि कवी मयूर पालकर यांच्या साहित्यिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आणि 'शब्द माझे तुझ्याचसाठी' आणि 'मयूरस्पर्श' या पुस्तकांचे प्रकाशन झाले असे जाहीर केले. उत्तोमत्तम कथा कवितासंग्रह निर्माण करणाऱ्या साहित्यसंपदा प्रकाशनची ही दोन्ही पुस्तके आहेत. शब्दशिल्प कलाविष्कार संघ सर्वेसर्वा हिरकणी गीतांजली वाणी यांनी "दोन्ही पुस्तकांच्या शेकडो आवृत्त्या प्रकाशित होवोत" अशा शुभेच्छा दिल्या व मयूर पालकर हे आधुनिक युगातील परिपक्व कवी आहेत, भविष्यात त्यांच्या साहित्यिक संपदेची खास आवड असणारे वाचक असतील असे त्या म्हणाल्या. शुभंकरोती साहित्यिक संस्था संस्थाप्पाक कवयित्री सोनाली जगताप यांनी दोन्ही पुस्तके आवर्जून वाचण्यासारखी आहेत असे सांगितले तर कवयित्री प्रियांका कोठावदे, रजनी येवले यांनी मयूरस्पर्श मधील काही चारोळ्यांचे वाचन केले. साहित्य संपदा संस्थेतर्फे निरनिराळ्या क्षेत्रातील भरीव योगदान देणाऱ्या दिग्गज्जाचे सन्मान - पुरस्कार वितरण देखील या सोहळ्यात करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता हर्डीकर ह्यांनी करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. सचिन बोलके ह्यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# राज्य लॉटरीचा दिवाळी धमाका!!
## एक कोटीचे बक्षीस यवतमाळच्या ग्राहकाला!

मुंबई दि. प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य लॉटरी विक्रेता सेनेतर्फे आयोजित महाराष्ट्र दिवाळी भव्यतम सोडतीच्या खरेदीवर विक्रेत्यांना रोख रकमेची आकर्षक बक्षिसे असल्याने यंदा लॉटरीची विक्रमी विक्री झाली. एक कोटीचे बक्षीस यवतमाळच्या न्यू जय अंबे लॉटरी केंद्रातल्या ग्राहकाला मिळाले असून यंदाची दिवाळी ही ग्राहकांसोबत विक्रेत्यांनाही धनवान करून गेली असल्याची माहिती लॉटरी विक्रेत्यांचे जेष्ठ नेते श्री विलास सातार्डेकर यांनी दिली आणि विजेत्याचे अभिनंदन केले आहे. महाराष्ट्र राज्याच्या दिवाळी भव्यतम सोडतीचे ग्राहकांमध्ये प्रचंड आकर्षण असून लॉटरीची वैभवशाली परंपरा आहे. लॉटरी संघटनेने लॉटरीची विक्रमी विक्री व्हावी या प्रामाणिक हेतूने एक योजना राबविली त्यात २५ तिकीटांच्या खरेदीवर एक रोख रकमेचे आकर्षक कुपन देण्यात आले त्याला महाराष्ट्र भरातून विक्रेत्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला आणि लॉटरीच्या विक्रीवर सकारात्मक परिणाम झाला. नवी मुंबईत मंगळवारी दिवाळी भव्यतम सोडत काढून निकाल जाहीर झाला त्या पार्श्वभूमीवर सातार्डेकर पत्रकारांशी बोलत होते. राज्य शासनाने २०० रुपये तिकीटात




कोट्यावधी रुपयांची बक्षिसे जाहीर केली होती त्यात पहिले बक्षीस १ करोड जे यवतमाळ येथील न्यू अंबे लॉटरी विक्रेता भंडार येथील ग्राहकाला लागले तर प्रोत्साहनपर २ लाखांची चार बक्षिसे दुसरी ५लाखाची पाच बक्षिसे तिसरी १ लाखाची पाच बक्षिसे यासह सर्व मालिकांसाठी अनेक बक्षिसे दिवाळी सणासाठी लावण्यात आली होती विजेत्यांचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य लॉटरी विक्रेता सेनेचे संस्थापक अध्यक्ष श्री विलास सातार्डेकर यांनी विक्रेत्यांसाठी जो कुपन निकाल घोषित केला होता त्यानुसार लाखो रुपयांची बक्षिसे आहेत बक्षिसांची रचना ही लॉटरी विभागाच्या निकालावर करण्यात आली आहे या कुपनात पहिले बक्षिस ५० हजार (१० हजारांची ५ बक्षिसे) दुसरे बक्षिस ५० हजार(५ हजारांची १० बक्षिसे) तिसरे बक्षिस २० हजार (२ हजारांची १० बक्षिसे) आणि चौथे बक्षिस १० हजार (१ हजाराची १० बक्षिसे) अशी आहेत. ज्या विक्रेत्यांनी (एजंट) तिकिट विक्री थेट केली असेल त्यांनी कुपनसह व लॉटरी केंद्राच्या नाव पत्त्यासह आपला फोटो हा थेट संघटनेच्या पदाधिकाऱ्यांपर्यत पोहोचवावा जेणेकरून त्याची शहानिशा करून बक्षिसांची रक्कम विक्रेत्याला देणे शक्य होईल या संदर्भात अधिक माहितीसाठी विलास सातार्डेकर ( संस्थापक अध्यक्ष) ( ९ ८ ९ २ ८ १ ७ ५ ९ ७ ) राजेश बोरकर (सरचिटणीस) ( ९ ० ० ४ ४ ७ १ ८ ८ ५ ) कमलेश विश्वकर्मा (उपाध्यक्ष) (८९२८४१२२५८) या क्रमांकावर येत्या दहा दिवसांत संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेचा अनिलदादा जगताप यांना जाहीर पाठिंबा!

बीड, प्रतिनिधी- विधानसभा निवडूक तोंडावर येऊन ठेपलेली असताना बीड विधानसभा अपक्ष उमेदवार मा. अनिलदादा जगताप यांना विविध संघटनेचा जाहीर पाठिंबा मिळत असून बीड मतदार संघात अनिलदादा यांची ताकद दिवसेंदिवस वाढत चालली आहे. काल दि. 15 नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष शेख अमर जैनुद्दीन यांच्या आदेशा नुसार बीड विधानसभा अपक्ष उमेदवार मा. अनिलदादा जगताप यांना विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्र



बांधकाम मजूर संघटनेच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला. तसेच सर्वांनी मिळून बीड विधानसभा मतदारसंघातील सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी यांना सूचित केले की, अनिलदादा जगताप यांनाच सहकार्य करावे आणि विक्रमी मताधिक्याने निवडून आणावे. याप्रसंगी महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष शेख अमर जैनुद्दीन, प्रा.पंडीत तुपे, अॅड. नजर खान, शेख खय्युम इनामदार, शेख नसीरभाई बीड जिल्हाध्यक्ष, सुंदर वाघमारे, जयत शिवाजीराव वाघ बीड जिल्हा उपाध्यक्ष, हनुमंत बाबासाहेब मिसाळ बीड तालुकाध्यक्ष, शेख खय्युम बीड शहराध्यक्ष, शेख खदीरभाई, शेख असरार बीड शहर उपाध्यक्ष, सय्यद फेरोज बीड तालुका उपाध्यक्ष, रौफ शेख उपस्थित होते. या सर्वांनी मिळून अनिलदादा यांना पाठिंब्याचे पत्रक ठेऊन विजयासाठी शुभेच्छा दिल्या. दरम्यान अनिलदादा यांनी महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेच्या सर्व पदाधिकारी सदस्यांचे आभार व्यक्त केले.
०००००

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com